# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैद्यानिक महामंडळ)**

**३२ वा मजला, सेंटर -१ इमारत, जागतीक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दुरध्वनी : (०२२) ६९९६५५५५ फॅक्स : २२१५१६७ ई-मेल : info.mahasecurity@maharashtra.gov.in/armsammunition.mahasec@gmail.com**


**जा.क्र.मरासुम/हत्यार व दारुगोळा/ २१७५ /२०२४** **दिनांक : १०/०७/ २०२४**

## -: जाहिरात :-

**विषय :-** शस्त्र साफसफाई करिता साहित्य खरेदी करणेबाबत.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कार्यालयाव्दारे शस्त्र साफसफाई करिता आवश्यक साहित्य पुरवठा करण्यासाठी माहे सप्टेंबर २०२४ ते ऑगस्ट २०२५ या कालावधी करिता पुरवठादार निश्चित करण्याचे प्रायोजीत आहे.

जाहिरातीमध्ये नमूद केलेले साहित्य व त्याचा तपशिल (Specification) नुसार दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात इच्छुक पुरवठादारकांनी दि. १०/०७/२०२४ ते दि. २२/०७/२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत सादर करावीत. त्यांनतर येणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

शस्त्र साफसफाई करिता आवश्यक साहित्य तसेच साहित्यांच्या Specification बाबतच्या अधिक माहिती करिता **www.mahasecurity.gov.in** व **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटला भेट द्यावी.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचा राहील.

**Sd/-**
**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

## १) परिचय

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ, असुन महाराष्ट्र राज्य पोलीस दलाला कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी, गुन्हे नियंत्रण, दहशतवादी हल्ला रोखण्यासाठी तसेच पोलीसांना नेमुन दिलेल्या इतर कर्तव्यासाठी मुक्त करून त्या ठिकाणी फक्त संरक्षण व सुरक्षा प्रदान करण्यासाठी विशेषरित्या प्रशिक्षित अधिकारी व जवानाची नेमणुक करण्याच्या विशिष्ठ उद्देशाने महाराष्ट्र शासनाने सन २०१० साली, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, अधिनियम २०१० अन्वये, या महामंडळाची निर्मिती केलेली आहे.

महामंडळातर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील आस्थापनांवर १२ बोअर पंप ॲक्शन शॉट गन, .३०३ रायफल, ४१० मस्केट ही शस्त्रे आहेत. शस्त्रांच्या साफसफाई करिता आवश्यक साहित्याचा पुरवठा करणे हेतु एका वर्षासाठी पुरवठादार निवड करण्याच्या अनुषंगाने सदर जाहिरातीव्दारे इच्छुक पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

## २) शस्त्र साफसफाई करिता आवश्यक साहित्य व साहित्यांचे निर्धारित केलेले तपशिल (Specificaton) :-

**खालील तक्त्यात नमूद तपशिल नुसार साहित्य पुरवणार असल्यास अ.क्र. ४,५,६ मध्ये आपले दर नमूद करुन दरपत्रक (Quotation) कार्यालयाच्या पत्त्यावर नमूद दिवासाच्या आत वेळेत सादर करावे.**

| Sr.No. | Rifle Cleaning Material Name | Specification | Per Rate | Per GST% | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Rifle Chindi (12 Bore Gun) | 1. Length of Roll - 10 Meter<br>2. Width - 10 Centimeter<br>3. Mass Per Roll - 160 Gram<br>4. Ends cm - 18<br>5. Raised Surface - Both Sides<br>6. Free from dressing and filling material - Yes<br>7. Easily Tear able by hand along the red strips - Yes<br>8. color of Printed strip parallel to weft - Red<br>9. Gap between the printed strips (throughout the length of roll) - 5 centimeter<br>10. Printed strip width 3 millimeter | | | |
| 2 | Rifle Ceiling belt (12 Bore Gun) | 1. Ceiling Synthetic Belt<br>2. Light weight web equipment<br>3. Size of Belt Medium | | | |
| 3 | Rifle Chain (12 Bore Gun) | 1. Length of chain - 150 cm<br>2. Material - Steel | | | |
| 4 | Rifle Oil (Oil OX-52) - Superior (12 Bore Gun) | 1. Oil ox - 52<br>2. Make - Servo | | | |
| 5 | Rifle Pull Through (12 Bore Gun) | 1. B1 / 1005 - 557499<br>2. Nylon | | | |
| 6 | Rifle Cleaning Greece (12 Bore Gun) | 1. Color: Yellow<br>2. Form: Paste | | | |
| 7 | Rifle Cotton Waste (12 Bore Gun) | 1. Material: Cotton<br>2. Form: Cotton salvage waste<br>3. Color: White<br>4. Packaging Size: Loose | | | |

**टिप :- उपरोक्त तक्त्यात नमूद एकूण- ७ साहित्यांचे योग्य ते तपशिल अ.क्र. ३ मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरुन आपले प्रत्येकी एका साहित्या करिताचे दर एकत्रितरित्या अ.क्र. ४,५,६ मध्ये नमूद करावेत.**

## ३) दरपत्रक पाठविणे करिता व उघडणेकरीता हजर रहावयाचे असल्यास पत्ता व दुरध्वनी क्र. :-

मा. पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ वा मजला, जागतीक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स : (०२२) २२१५१६७.

## ४) महत्वाच्या दिनांक व वेळ :-

१. दरपत्रके सादर करण्याची दिनांक १०/०७/२०२४ वेळ सकाळी १०.०० वाजता पासून सुरु.
२. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक २२/०७/२०२४ व वेळ संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत.
३. दरपत्रके उघडण्याची दिनांक २५/०७/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता.

## ५) सूचना :-

कृपया दरपत्रक सादर करण्या पुर्वी खालील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

१. इच्छूक पुरवठादारकांनी एका वेळेस एकच दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.
२. एका पुरवठादाराची अनेक दरपत्रक प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही.
३. अंतीम दिनांका नंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
४. पुरवठादाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत.
५. मुख्यालयास आवश्यक शस्त्र साफसफाई साहित्य क्रमांक व (Specification) यादी सोबत सादर करण्यात आली आहे.
६. सदर यादीमधील Requirement नुसार देण्यात आली आहे. भविष्यामध्ये या व्यतीरिक्त विविध साहित्याची आवश्यकता भासणार आहे. ते सादर केलेले यादीत नमूद नाहीत. तसे साहित्य ऐनवेळी आवश्यकतेनुसार मागवतांना वाटाघाटीनुसार किंमत ठरविण्यात येईल.
७. पुरवठादाराने सोबत जोडलेल्या यादीतील मरासुम कार्यालयास साधारण आवश्यक शस्त्र साफसफाई साहित्य तपशिलानुसार त्या नग संख्येनुसार त्यावर आकारण्यात येणाऱ्या GST तसेच इतर करासह दर व दर्जा नुसार नमूद करावा.
८. महामंडळास नवीन शस्त्र साफसफाई साहित्याची आवश्यकता असल्यास म्हाणजेच, जे सोबत जोडलेल्या यादीतील क्रमांका मध्ये व (Specification) मध्ये नमूद नाही; परंतु महामंडळाच्या कामकाजाचा खोळंबा होणार नाही, या हेतूने तात्काळ महामंडळास आवश्यकता भासत असल्याने सदर साहित्य पुरविणे आवश्यक आहे.
९. कोणत्याही कारणास्तव जाहिरात पुर्णपणे किंवा अंशत: रद्द करण्याचा अधिकार महामंडळाकडे आहे. आणि इच्छुक पुरवठादारकांनी दरपत्रक सादर केल्यावर जाहिरात रद्द केल्यास त्याबाबतची सूचना कळविली जाणार नाही.
१०. पुरवठादारकांची निवड केल्यानंतर त्यांना महामंडळास पुरवठा करणे बंद करावयाचा असल्यास ३० दिवस आधी लेखी सुचना द्यावी लागेल.
११. महामंडळास पुरवठादार यांचा शस्त्र साफसफाई साहित्य पुरवठा बंद करावयाचा असल्यास त्यांना ३० दिवस आधी लेखी सुचना देण्यात येईल.

## ६) निवड प्रक्रिया :-

१) जे पुरवठादार महामंडळास आवश्यक शस्त्र साफसफाई करिता लागणारे साहित्य उत्तम दर्जाचे देण्यास इच्छूक आहेत अशा पुरवठादारकांची निवड यादी तयार करण्यात येईल.
२) निवड प्रक्रिये दरम्यान आवश्यकता भासल्यास (Negotiation) वाटाघाटी संदर्भात पुरवठादाराशी चर्चा करणे हेतू कार्यालयास हजर रहावे लागेल.
३) निवड केलेल्या पुरवठादारकांस निवड केल्याचे पत्र ई-मेल आय-डीद्वारे तसेच पत्राद्वारे कळविले जाईल.
४) निवड केल्याचा निकाल, महामंडळाच्या **www.mahasecurity.gov.in** या संकेतस्थळावर दिसून येईल.
५) निवडलेल्या पुरवठादारकास साहित्य पुरवठाकरावयाच्या अटी व शर्तीसह नियुक्ती पत्र दिले जाईल.

**७) <u>पुरवठादारकांनी सादर करावयाची कागदपत्र :-</u>**

१) निवड केलेल्या पुरवठादाराने दुकानाच्या नावे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणे हेतु, कागदपत्रांची साक्षांकीत कॉपीचा एक सेट सोबत जोडून सादर करणे आवश्यक आहे.
२) दुकान मालकाचे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.
३) ओळखपत्र जसे की, पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र इत्यादी.
४) विविध प्रकारचे शस्त्र साफसफाई साहित्य पुरवित असलेल्या अन्य कंपन्यांचे अनुभव प्रमाणपत्र.
५) कंपनी / फर्मच्या नावे GST अंतर्गत नोंदणी असल्याबातचे प्रमाणपत्र.
६) कंपनी / फर्मच्या नावे मागील तीन वर्षाचे (Income Tax Return Acknowledgement.) आयकर विवरणपत्राच्या प्रती जोडाव्या. तसेच त्यात कंपनीचा मागील तीन वर्षाचा (Turn Over) र्टन ओवर नमूद असल्याची प्रत जोडावी.

सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी/कोणत्याही कारणास्तव/कोणत्याही टप्प्यावर/ पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा/फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

**Sd/-**
**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**